# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.06.2026** **वारःमंगळवार**

1. बावन्नाव्या जी-सात परिषदेला फ्रान्समधल्या एवीयन शहरात प्रारंभ. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सहभागी होणार.
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्लोव्हाकियाचा द ऑर्डर ऑफ द व्हाइट क्रॉस, फर्स्ट क्लास हा सर्वोच्च सन्मान प्रदान
3. अमेरिका-इराण शांतता कराराला गती मिळाल्यानं पश्चिम आशियातील तणाव निवळण्याची आशा
4. नीट फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह सचिवांकडून उच्चस्तरीय आढावा बैठक आणि
5. फिफा विश्वकरंडक स्पर्धेत केप वेर्डे या छोट्या देशानं पदार्पणातच केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे स्पेनबरोबरचा सामना बरोबरीत.

**<u>जी-7 शिखर परिषद</u>**

52व्या जी-सात परिषदेला काल, फ्रांस मधील एवीयन शहरात प्रारंभ झाला. या परिषदेत, जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांचे नेते महत्वाच्या आंतरराष्ट्रीय आव्हानांवर चर्चा करणार आहेत. या परिषदेला युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन आणि युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा हे देखील उपस्थित आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत जागतिक असंतुलन कमी करणं, प्रमुख भू-राजकीय संकटांचा सामना करणं, संघटित गुन्हेगारी, तसंच बेकायदा आर्थिक व्यवहार यांच्या विरोधातील लढा अधिक बळकट करणं या विषयांवर चर्चा होणार आहे. कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, ब्रिटन आणि अमेरिका हे या परिषदेचे सदस्य देश आहेत.

या परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दाखल होत आहेत. आपल्या भेटीदरम्यान, मोदी, जी-7 सदस्य देशांचे नेते, तसंच जागतिक बँक आणि आफ्रिकन डेव्हलपमेंट बँकेचे प्रतिनिधी यांची भेट घेतील. याच भेटीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी, कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्ने, इंग्लंडचे पंतप्रधान कीर स्टार्मर आणि संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख महम्मद बिन झायेद अल् नाह्यान यांची भेट घेतील, तसंच, फ्रांसचे अध्यक्ष एमन्युएल मॅक्रों यांनी आयोजित केलेल्या भोजन समारंभाला उपस्थित राहतील.

**<u>स्लोव्हाकिया</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल स्लोव्हाकियाचा द ऑर्डर ऑफ द व्हाइट क्रॉस, फर्स्ट क्लास हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. स्लोव्हाकियाचे अध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांनी मोदी यांना हा सन्मान प्रदान केला. या सन्मानाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी स्लोव्हाकिया सरकार आणि जनतेचे आभार मानले. हा सन्मान म्हणजे भारताच्या एकशे चाळीस कोटी जनतेचा सन्मान असल्याचं आणि भारत आणि स्लोव्हाकियाच्या दृढ मैत्रीचं प्रतीक असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<u>पश्चिम आशिया</u>**

अमेरिका आणि इराण यांनी संघर्ष समाप्त करण्याची भूमिका जाहीर केल्यामुळे पश्चिम आशियातील तणाव निवळण्याची आशा निर्माण झाली आहे. पश्चिम आशियातील संघर्ष समाप्त करत असल्याची घोषणा काल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल केली. या संदर्भात इराणशी करार करण्यात आल्याचं ते म्हणाले.

ट्रंप यांनी या कराराबाबतचे तपशील अधिकृत स्वाक्षऱ्या झाल्यानंतर जाहीर करण्यात येतील असं सांगितलं आहे. उपाध्यक्ष जे डी व्हान्स यांनी करारावर डिजिटल स्वरूपात स्वाक्षऱ्या झाल्याचं स्पष्ट केलं आणि संघर्ष समाप्त करण्यासाठी हे महत्वाचं पाऊल असल्याचं नमूद केलं. इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनीही हा युद्ध संपवण्यासाठीचा महत्त्वाचा टप्पा असल्याचं म्हटलं आहे. करारातील महत्त्वाच्या तरतुदी अजून दोन्ही बाजूंकडून अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आलेल्या नाहीत.

दरम्यान, पश्चिम आशियातील संघर्ष संपवण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या कराराचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. या कराराच्या अंमलबजावणीमुळे या भागात शांतता आणि स्थिरता पुन्हा प्रस्थापित होण्यास मदत होईल, अशी आशा त्यांनी समाजमध्यमांवरील संदेशांत व्यक्त केली आहे.

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव आंटेनियो गुटेरस यांच्यासह जगभरातील नेत्यांनी या काराराचं स्वागत केलं आहे.
दरम्यान, अमेरिका आणि इराणनं संघर्ष संपवण्याची घोषणा केली असली, तरीही, इस्रायली सैन्य सीमेपलीकडील आपल्या जागांवरून माघार घेणार नाही अशी भूमिका इस्रायलने घेतली आहे.

**नीट बैठक**

नीट फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी काल उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. परीक्षेबाबत सुरक्षा आणि इतर तयारीचा त्यांनी आढावा घेतला. सर्व राज्य सरकारांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी आणि केंद्रीय विभागांनी सुरक्षाविषयक नियमांचं काटेकोर पालन करावं, असे निर्देश त्यांनी दिले. विद्यार्थ्यांचा प्रवास सुकर करण्याची विनंतीही करण्यात आली.

**युवा संसद**

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयातर्फे नवी दिल्लीत, 'विकसित भारत युवा संसद 2026'चं आयोजन करण्यात आलं आहे. लोकसभेचे सभापति ओम बिर्ला यांच्या हस्ते आज या परिषदेचं उद्घाटन होणार आहे. या उपक्रमामुळे युवकांना लोकशाही प्रक्रियेतील तरुणांचा सहभाग, प्रशासन, संसदीय कामकाज यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. विकसित भारत युवा संसद, देशातील तरुणाईची ऊर्जा, कल्पना आणि आकांक्षांना राष्ट्रीय प्रवाहात आणणारी चळवळ आहे.

**मोदी सरकार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या बारा वर्षांमध्ये सबका साथ सबका विश्वास आणि सबका प्रयास या तत्वाच्या अंतर्गत मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले आहेत. या काळात मोदी सरकारनं गरीब, शेतकरी, महिला आणि युवक कल्याण आणि सबलीकरणाबाबत अनेक कार्यक्रम राबवले आहेत. दहशतवादाविरोधात सरकारनं कडक भूमिका घेतली आहे गेल्या वर्षी ऑपरेशन सिंदूर मोहिमेत भारतानं जगाला स्पष्ट संदेश दिला. भारताला युद्ध नको आहे, पण दहशतवादही सहन केला जाणार नाही, असा संदेश भारतानं दिला. या मोहिमेत पाकिस्तानातले नऊ महत्त्वाचे तळ उद्ध्वस्त करण्यात आले. गेल्या वर्षी नऊ आणि दहा मेला एकाच कारवाईत पाकिस्तानातल्या 11 विमानतळांवरही हल्ला करण्यात आला. या कारवाईसाठी जगभरातल्या नेत्यांनी भारताला पाठिंबा दिला. भारतानं सात शेजारी देशांबरोबर असलेल्या सीमेची सुरक्षा करण्यासाठी भारतानं ठोस पाऊलं उचलली आहेत.

**योग दिन**

येत्या 21 जून रोजी साजरा होणाऱ्या बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली कोलकाता इथं होणार आहे. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी काल दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. संस्कृती मंत्रालयातर्फे देशभरातल्या 100 प्रसिद्ध ऐतिहासिक वारसा स्थळांवर तसंच परराष्ट्र मंत्रालयातर्फे जगभरात अडीच हजार ठिकाणी योग दिनाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येत असल्याची माहिती जाधव यांनी दिली.

**राम मंदिर-चौकशी समिती**

अयोध्येतील श्रीराम मंदिरात मिळालेल्या देणग्या आणि मौल्यवान वस्तूंच्या बाबतीत गैरव्यवहार होत असल्याच्या तक्रारींवरून, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उत्तर प्रदेश राज्य सरकारने एका विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. या पथकाने कालपासून तपासाला सुरुवात केली असून काल त्यांनी अयोध्येचे आयुक्त आणि जिल्हा दंडाधिकारी यांच्यासमवेत राम मंदिराची पाहणी केली.

**रेल्वे सेवा**

पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वे सेवा उद्यापासून सुरू होत आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते पुण्यात उद्या या रेल्वे सेवेचा प्रारंभ होणार आहे. अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर खासदार नीलेश लंके रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. पुणे, अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी परिसरातील प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक तसंच साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ही रेल्वेसेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**मिफ्फ**

एकोणिसाव्या मिफ्फ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला काल मुंबईत सुरुवात झाली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरूगन, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲडव्होकेट आशीष शेलार यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत महोत्सवाचं उद्घाटन करण्यात आलं. यावर्षीच्या स्पर्धा विभागात 144 चित्रपटांचा समावेश आहे. यात 13 देशांतल्या 52 आंतरराष्ट्रीय आणि 92 राष्ट्रीय प्रवेशिकांचा समावेश आहे.

**फिफा**

फिफा विश्वकरंडक स्पर्धेत काल केप वेर्डे या छोट्या देशानं पदार्पणातच आपल्या कौशल्याची चुणूक दाखवून दिली. या देशाच्या खेळाडूंनी केलेल्या कामगिरीमुळे स्पेनबरोबरचा सामना 0-0 असा बरोबरीत सुटला. केप वेर्डेच्या विझोन्हा या चाळीस वर्षांच्या गोलरक्षकानं स्पेनचा झंझावात रोखून धरला. सौदी अरेबिया आणि उरुग्वे यांचाही सामना 1-1 असा बरोबरीत सुटला. आज संध्याकाळी साडेसहा वाजता इराण आणि न्यूझिलंडमध्ये लॉस एंजलिसमध्ये सामना होणार आहे.

**हवामान अंदाज**

भारतीय हवामानशास्त्र विभागानं अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, बिहार, केरळ, तमिळनाडू या राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. कोकण आणि गोव्यासह मध्यप्रदेश, ओडिशा, पंजाबमध्ये विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे वाहण्याचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तेलंगण आणि विदर्भात उष्णतेची लाट कायम राहील, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात उष्ण आणि दमट हवामान कायम राहील असंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.